PARLE MAHOTSAV
www.parlemahotsav.com

19th PARLE MAHOTSAV
CM चषक
Organised by : Vile Parle Cultural Centre
In Association with PTVA'S Sathaye College

www.cmchashak.com

2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (E), Mumbai - 400 057. Contact : 2617 7125 / 2613 6513

दिनांक २५ डिसेंबर २०१८

**कृपया प्रसिद्धीसाठी**

**१९ वा पार्ले महोत्सव चषक .एम .सी -**

**पार्ले महोत्सवसारख्या उपक्रमांमुळे छंद जोपासणे शक्य : प्राचार्य डॉ. माधव राजवाडे**

प्रत्येकाला एखादा छंद असावा व तो सातत्याने जोपासावा असे म्हणत पार्ले महोत्सवसारख्या उपक्रमांमुळे आपले छंद जोपासणे शक्य होते, असे प्रतिपादन साठ्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव राजवाडे यांनी केले. 19 वा पार्ले महोत्सव-सी.एम. चषकमधील साठ्ये महाविद्यालयात होणा-या नऊ विविध स्पर्धांच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. महोत्सवाच्या सह आयोजक या नात्याने भूमिका पार पाडण्याचा साठ्ये महाविद्यालयास सार्थ अभिमान असून पुढेही महोत्सवाच्या आयोजनात आमचा सहभाग राहिल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

साठ्ये महाविद्यालयामधील स्वर्गीय पु. ल. देशपांडे कला नगरीत आज गायन, कराओके गायन, चित्रकला, हस्ताक्षर, रांगोळी, सदृढ बालक तसेच कॅरम व बुद्धीबळ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धांच्या एकत्रित उद्घाटन सोहळ्यात डॉ. माधव राजवाडे व आमदार पराग अळवणी यांनी बुद्धीबळाचा एक डाव खेळून उद्घाटन केले. याचसोबत विलेपार्ले पूर्व येथील दुभाषी मैदान येथे कबड्डी, बॉक्स क्रिकेट व व्हॉली बॉल तर विलेपार्ले पश्चिम येथे फुटबॉल, पिकल बॉल व लॉन टेनिस स्पर्धांचाही शुभारंभ झाला.

19 व्या पार्ले महोत्सव – सीएम चषकात आतापर्यंत अवघ्या तीन दिवसांत उद्घाटन सोहळ्यासह 25 हजार पेक्षा अधिक स्पर्धकांच्या उपस्थितीत 22 प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन झाले असल्याची माहिती प्रमुख आयोजक व भाजपा आमदार ॲड. पराग अळवणी यांनी दिली. यापैकी साठ्ये महाविद्यालय, दुभाषी मैदान तसेच स्पोर्टिंग लायन्स मैदानात सुमारे 18 हजार स्पर्धकांनी भाग घेतला तर सुमारे सात हजार विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत भाग घेतला असल्याची माहिती त्यानी उद्घाटन सोहळ्यात आपल्या भाषणात दिली

Website : **www.parlemahotsav.com** E-mail : **vileparleculturalcentre@gmail.com**
Please Visit us at - YouTube Parle Mahotsav | fb.me/parlemahotsav | @parlemahotsav | parle_mohatsav